| | | | |
|---|---|---|---|
| MHGA110004242025 | दाखल तारीख | :– | २८.०८.२०२५ |
| | नोंदणी तारीख | :– | २८.०८.२०२५ |
| | निकाल तारीख | :– | २७.०३.२०२६ |
| | कालावधी | :– | ००वर्षे,०६महिना, ३०दिवस |
| | **निशाणी क्रमांक ०९ सलग** | | |

**भाग ''अ''**

**{फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण ६ परिच्छेद ४४ (i)}**

| | | |
|---|---|---|
| | **कुरखेडा येथील न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी न्यायालयात**<br>**पिठासीन अधिकारी : एन.पी. देशपांडे**<br>**(न्यायंदाधिकारी प्रथम श्रेणी)** | |
| | **न्यायनिर्णय दिनांक २७ मार्च, २०२६ रोजी** | |
| | **संक्षिप्त फौजदारी खटला क्रमांक २५२/२०२५** | |
| | अपराध क्रमांक १३२/२०२५, महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) पोलीस ठाणे कुरखेडा, ता.जि.–गडचिरोली. | |
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र शासनतर्फे<br>पोलीस ठाणे अंमलदार,<br>पोलीस ठाणे कुरखेडा,<br>जिल्हा– गडचिरोली |
| **अभियोग पक्षातर्फे** | विद्वान सहाय्यक सरकारी वकील श्री. ए.पी. नाकाडे | |
| **आरोपी** | | **दादाजी कृष्णाजी नाकतोडे,**<br>वय:– ५७ वर्षे, धंदा – मजुरी,<br>राहणार– गोठणगांव, तालुका– कुरखेडा,<br>जिल्हा–गडचिरोली. |
| **आरोपीतर्फे** | | विद्वान विधीज्ञ श्री. जि.एम. नागमोती |

**भाग ''ब''**

**{फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii)}**

| | |
|---|---|
| अपराधाची तारीख | २७.०७.२०२५ |
| पहिली खबरीची तारीख | २७.०७.२०२५ |
| दोषारोपत्राची तारीख | २८.०८.२०२५ |
| दोषारोप निश्चीतीची तारीख | २९.०९.२०२५ |
| जबाब नोंदणी सुरू झाल्याची तारीख | ०६.०३.२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | --- |
| न्यायनिर्णयाची तारीख | २७.०३.२०२६ |
| शिक्षा आदेशाची तारीख, असल्यास | --- |

**आरोपीचा तपशील :**

| आरोपीचे स्थान | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोपातील गुन्हे | निर्दोष मुक्त अथवा शिक्षा | लादलेली शिक्षा | खटल्याची प्रकिया सुरू असतांना आरोपी न्यायाधीनबंदी असल्याचा फौ.प्र.सं. च्या कलम ४२८ प्रमाणे सुट मिळण्यासाठी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १) | **दादाजी कृष्णाजी नाकतोडे** | -- | २८.०८.२५ | कलम ६५(ई) महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ | निर्दोष मुक्त. | निरंक. | लागु नाही. |

**<u>भाग ''क''</u>**

**{फौजदारी मार्गदर्शिका प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii)}**

**सरकारपक्ष/बचाव/न्यायालयीन साक्षदारांची यादी**

**अ. सरकारपक्ष :**

| **स्थान** | **नांव** | **पुराव्याचे स्वरूप** (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| स.सा.१ | मनोहर मोडकु कुडमेथे | घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याचे पंच साक्षदार |

| | | |
|---|---|---|
| स.सा.२ | रत्नाकर रावजी घरत | घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याचे पंच साक्षदार |

**ब. बचाव, असल्यास :**

| **स्थान** | **नांव** | **पुराव्याचे स्वरूप**<br>(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | –निरंक.– | –निरंक.– |

**क. बचाव न्यायालयीन साक्षदार, असल्यास :**

| **स्थान** | **नांव** | **पुराव्याचे स्वरूप**<br>(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| | –निरंक.– | –निरंक.– |

**सरकारपक्ष/बचाव/न्यायालयीन निशाणींची यादी**

**अ. सरकारपक्ष :**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **विवरण** |
|---|---|---|
| | –निरंक.– | –निरंक.– |

**ब. बचावपक्ष :**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **विवरण** |
|---|---|---|
| | –निरंक.– | –निरंक.– |

**क. न्यायालयीन निशाणी :**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **विवरण** |
|---|---|---|
| १. | नि.क्र.०८ | रासायणीक विश्लेषण अहवाल |

**ड.    महत्वाचे वस्तु :**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| | –निरंक.– | –निरंक.– |

---

**दोषारोप : महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) अंतर्गत**

---

## न्यायनिर्णय

(दिनांक २७ मार्च, २०२६ रोजी घोषित)

आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) नुसार शिक्षापात्र अपराधासाठी संपरिक्षा चालविण्यात आली.

२.    खटल्यातील आलेल्या माहीतीवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | दिनांक २७.०७.२०२५ रोजीचे १३.१८ ते १३.५५ वाजता मौजा गोठणगांव ते मालदुगी रस्त्यावर तालुका–कुरखेडा, जि. गडचिरोली येथे आरोपीच्या घरी घरझडतीत त्याचे ताब्यात संत्रा कंपनीच्या ९० मिलीच्या ३५ बाटल्या देशी दारू अवैधरीत्या विना परवाना विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगतांना मिळून आला व त्याद्वारे त्याने महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | ... | नकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

३.    आरोपी विरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने पंच साक्षीदार क्रमांक १ मनोहर मोडकु कुडमेथे व साक्षीदार क्रमांक २ रत्नाकर रावजी घरत यांची नि.क्र. ०९ वर साक्ष नोंदविली आहे. अभियोग पक्षाने नि.क्र. १२ खाली पुरावा संपल्याची पुरसिस

दिली. खटला चालवित असतांना आरोपी विरुध्द गुन्ह्या संदर्भात कोणतीही विधाने आलेली नसल्यामुळे निशाणी क्र. ०१ खाली आदेश दिनांक ०६.०३.२०२६ नुसार भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम ३५१ प्रमाणे आरोपीची जबानी नोंदविण्यात आली नाही. आरोपीचा बचाव त्याने गुन्हा केला नाही असा आहे. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

**<u>मुद्दा क्र. १ करीता</u>** –

४. आरोपी वरील महाराष्ट्र दारूबंदी कायदयाचे कलम ६५(ई) चे दोषारोप सिध्द करण्यासाठी अभीयोग पक्षाला आरोपीचे ताब्यात संत्रा कंपनीच्या ९० मिलीच्या ३५ बाटल्या देशी दारू अवैधरीत्या विना परवाना विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगतांना मिळून आला हे सिध्द करावे लागेल.

५. अभियोग पक्षाने जप्ती पंचनाम्याचे पंच म्हणून साक्षीदार क्रमांक १ मनोहर मोडकु कुडमेथे व साक्षीदार क्रमांक २ रत्नाकर रावजी घरत यांना निशाणी क्र. ०९ वर तपासले आहेत. सदरचे दोन्ही साक्षीदारांनी दिनांक २७.०७.२०२५ रोजीचे जप्ती पंचनाम्यावरील त्यांच्या सह्या मान्य केल्या असल्या तरी त्यामधील मजकुर नाकारला आहे. विद्वान सरकारी वकीलांनी त्यांना उलटतपासात ग्राहय असणारे प्रश्न विचारले तरी देखील त्यांनी त्यामध्ये दिनांक २७.०७.२०२५ रोजी पोलीसांनी आरोपीच्या घरी जप्ती पंचनाम्यासाठी बोलाविले, त्यांच्या समक्ष आरोपीचे ताब्यात संत्रा कंपनीच्या ९० मिलीच्या ३५ बाटल्या देशी दारू व त्याचा नमुना जप्त केल्याचे नाकारले आहे. त्यामुळे, प्रस्तुत साक्षीदारांच्या पुराव्यावरुन आरोपीचे ताब्यातून कथीत दारूची जप्ती सिध्द झाली नाही. अभियोग पक्षाने प्रस्तुत प्रकरणात जप्त मुद्देमालाचा रासायणीक पृथ्थ:करणाचा अहवाल नि.क्र.०८ वर दाखल केलेला असला तरी आरोपीचे ताब्यातून कथीत दारूची जप्ती सिद्ध झाली नाही. सबब, आरोपीच्या ताब्यातून कथीत दारूची जप्ती झाली ही बाब सिध्द करण्यांस अभियोग पक्ष अयशस्वी ठरल्यामुळे त्याचे विरूध्द ठेवलेले महाराष्ट्र दारूबंदी कायदयाचे कलम ६५(ई) चे दोषारोप सिध्द होत नाहीत. त्या अनुषंगाने मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर नकारार्थी देतो.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u>** –

६. माझे मुददा क्र. १ वरील उत्तराप्रमाणे आरोपीला दोषमुक्त करणे न्यायोचीत होईल. जप्त मुद्देमाल संत्रा कंपनीच्या ९० मिलीच्या ३५ बाटल्या देशी दारू हया अपील कालावधी संपल्यानंतर कायदयातील तरतुदीनुसार विल्हेवाट करणे न्यायोचीत होईल. सबब, मुद्दा क्र. १ चे उत्तर लक्षात घेता मुद्दा क्र. २ च्या उत्तरार्थ मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. आरोपी **दादाजी कृष्णाजी नाकतोडे** याला महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) च्या दंडनिय अपराधातुन भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७८(१) अन्वये दोषमुक्त करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. जप्त मुद्देमाल संत्रा कंपनीच्या ९० मिलीच्या ३५ बाटल्या देशी दारू अपील कालावधी संपल्यानंतर कायदयातील तरतुदीनुसार विल्हेवाट करण्यात याव्यात.

४. आरोपीने अपील दाखल झाल्यास अपील न्यायालयासमोर हजर राहण्यासाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८१ प्रमाणे दाखल केलेला वैयक्तीक जातमुचलका व जमानतदाराचे बंधपत्र पुढील सहा महिण्याकरीता अंमलात राहील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषीत करण्यात आला.)

Digitally signed by NAGESH PRABHAKAR DESHPANDE
Date: 2026.03.31 17:25:22 +0530

(एन.पी. देशपांडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कुरखेडा.

दिनांक : २७.०३.२०२६
स्थळ :– कुरखेडा.